लोकमत

# 'जेडीआयईटी'च्या विद्यार्थिनीची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क



स्नेहल काटपल्लीवार

यवतमाळ : येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्नेहल काटपल्लीवार या विद्यार्थिनीची प्लॅनेट स्पार्क या नामांकित कंपनीत ऑनलाईन कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड झाली. ती सिव्हील इंजिनिअरिंग शाखेची सत्र २०१९-२० मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या अंतिम वर्षाची विद्यार्थिनी आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन आहे. 'जेडीआयईटी'च्या प्रयत्नातून प्लॅनेट स्पार्क या कंपनीद्वारे ऑनलाईन आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कॅम्पस इंटरव्ह्यू पार पडले. यात ग्रुप डिस्कशन, ॲप्टीट्यूड टेस्ट, स्ट्रेस टेस्ट, टेक्नीकल टेस्ट, सेल्स डेमो आणि काही टास्क देण्यात आले. या टेस्टद्वारे शॉर्ट लिस्ट करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे पर्सनल इंटरव्ह्यू घेण्यात आले. यातून स्नेहल काटपल्लीवार या विद्यार्थिनीची अंतिम निवड करण्यात आली. तिला बिझनेस डेव्हलपमेंट ट्रेनी या पदावर कंपनीत रुजू करुन घेतले जाणार आहे. चार लाख ६४ हजार रुपयांचे वार्षिक पॅकेज घोषित केले आहे.

## प्लॅनेट स्पार्क ऑनलाईन व्यासपीठ

प्लॅनेट स्पार्क हे ऑनलाईन व्यासपीठ आहे. जिथे विद्यार्थी थेट वर्गाद्वारे नवयुगातील कौशल्य शिकतात आणि विकसित करतात. या कंपनीला एफआयआयटी जेईई, इंडियन एन्जेल नेटवर्क हैदराबाद एन्जल्स आणि लिड एन्जल्स यांचे पाठबळ आहे. हे व्यासपीठ इंग्रजी कम्युनिकेशन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पब्लिक स्पिकिंग, रोबोटिक्स, कोडिंग मेंटल मॅथ्स, एसटीईएम कोर्सेस आणि इतर न्यू एज स्कील कौशल्य शिकविण्याकरिता शक्तीशाली तंत्रज्ञानाचा लाभ पुरविते.